# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक १०/११/२०१९

**गडचिरोली पोलीस दलाकडुन कायदा व सुव्यवस्था राखाण्यासाठी रुट मार्च काढण्यात आला**

दिनांक ०९/११/२०१९ रोजी राम जन्मभुमी व बाबरी मस्जीद संबंधात मा. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे अंतिम निकाल असल्याने तसेच ईद ए- मिलाद च्या अनुषंगाने नागरीकांमध्ये कुठल्याही प्रकारच्या जातीय तणाव न होता सामाजिक सलोखा कायम राहावा याकरीता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. मोहीत कुमार गर्ग सा़ो. यांच्ये नेतृत्वाखाली गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने रुट मार्च काढण्यात आले होते. या रुट मार्च मध्ये २७५ पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवीला होता. सदर रॅली पटेल सायकल स्टोर्स, जामा मस्जीद, हनुमान मंदीर, ढिवर मोहल्ला, बेसीक शाळा राम मंदीर आरमोरी रोड, इंदिरा गांधी चौक, वैभव हॉटेल, चामोर्शी रोड, ते पोलीस स्टेशन गडचिरोली पर्यंत प्रमुख मार्गावरुन काढण्यात आले.

रुट मार्च दरम्यान राम जन्मभुमी बाबरी मस्जीद च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकाला दरम्यान वॉट्सअ‍ॅप फेसबुक या सारख्या सोशल मिडीया व आवश्यक इतर बाबींवर पोलीस दलाचे विशेष लक्ष राहणार आहे. पोलीस दल सर्व परीस्थिती हाताळण्यास सज्ज आहे. असा संदेश देण्यात आले. त्याचप्रमाणे जनतेच्या सहकार्याने राम जन्मभुमी, बाबरी मस्जीद व ईद ए- मिलाद यासाठी लावण्यात आलेले बंदोबस्त चांगल्या रीतीने शांततेपने पारपाडले असुन सहभाग नोंदविलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. मोहीत कुमार गर्ग सा़ो. यांनी कौतुक केले.

